केवळ खाजगी वितरणाकरिता

ECHOES INDIA

श्री राम चंद्र मिशन ®

जानेवारी २०१४ खंड ७ अंक ३








## मणपाक्कम, ३१ डिसेंबर २०१३ – १ जानेवारी २०१४

नाताळनंतर गुरुदेवांना किंचित ताप आला होता. डॉक्टरांना त्याची मोठी काळजी वाटत होती. परंतु, दि.३०च्या संध्याकाळपर्यंत त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली. चेन्नई व इतर केन्द्रांतून जवळजवळ आठ हजार अभ्यासी नववर्षाच्या स्वागतासाठी जमले होते. अभ्यासींची राहण्याची सोय करण्यासाठी गच्च्यांवर व खेळाच्या मैदानावर अतिरिक्त निवारे उभे करण्यात आले होते. नववर्षाच्या पूर्वसंध्येला ध्यानगृहात मुलांच्या नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता व गुरुदेवांनी तो सी.सी.टी.व्ही. च्या माध्यमातून पाहिला.


एक तारखेच्या सकाळी ध्यानगृह व गच्च्या पूर्ण क्षमतेनिशी शिगोशिग भरल्या होत्या. गुरुदेव सत्संग संचालित करतील अशी कोणालाच अपेक्षा नव्हती. परंतु अचानकपणे सर्वांना आनंदाचा सुखद धक्का देत गुरुदेवांनी ध्यानगृहात प्रवेश केला. प्रत्येकाला नववर्षाच्या शुभेच्छा देत त्यांनी आगमन करताच अभ्यासींमध्ये एकच जल्लोष झाला. खरोखरीच गुरुदेवांनी दिलेली नववर्षाची ती एक अपूर्व भेट होती. सत्संग एक तास कालावधीचा होता. त्यानंतर तीन अभ्यासींनी गायन प्रस्तुत केले. त्यापश्चात गुरुदेवांनी आपल्या नेहमीच्याच स्पष्ट व जोशपूर्ण आवाजात भाषण केले.

ते म्हणाले की, एखाद्याने किती वर्षे ध्यान केले याला फारसे महत्व नाही कारण पूर्वी होऊन गेलेल्या ऋषींनी हजारो वर्षे ध्यान केले परंतु बाबूजी महाराजांच्या कथनानुसार सहज मार्गात फक्त एका जन्मातच ध्येयाला साध्य करता येऊ शकते.

“तेव्हा, तुम्ही आता तरी जागे व्हा, द्वेषाला, दुसऱ्या माणसांचे अस्तित्व नाकारण्याच्या तसेच त्यांचे मूल्यमापन करण्याच्या वृत्तीला तुमच्या हृदयातून हद्दपार करा. स्नो–व्हाईट मधील राणीप्रमाणे आपण कसे आहोत हे आरशात स्वतः पाहा. आरशात पाहून राणीच्या मनात द्वेष वृद्धिंगत झाला व तिला स्नो–व्हाईटचा विनाश करण्याची इच्छा झाली. परंतु आपल्या बाबतीत मात्र, मी काय पाहतो आहे हे जाणून घेण्याच्या गरजेपोटी, जसजसा मी प्रामाणिकपणे आरशात स्वतःला अधिकाधिक पाहत जाईन, तसतसा, प्रथमतः स्वतःचे मूल्यमापन करण्यासाठी, त्यानंतर स्वतःमध्ये सुधारणा करण्यासाठी व अंतिमतः उत्क्रांतीच्या शिडीची एकेक पायरी वर चढण्यासाठी मी सक्षम बनेन.” सरते शेवटी ते म्हणाले, “तुम्हा सर्वांसाठी माझ्याकडे दोन संदेश आहेत. एक म्हणजे, वेळ वाया घालवू नका व दुसरा म्हणजे ‘ते’ ज्यांच्यावर प्रेम करतात त्या सर्वांवर प्रेम करा.”


काही वेळानंतर गुरुदेव येऊन उन्हामध्ये बसले. ओमेगा प्रशालेतील ११वी व १२वी च्या विद्यार्थ्यांनी गुरुदेवांची भेट घेतली. त्यांच्याशी संभाषण करत व प्रत्येकाला नववर्षाच्या शुभेच्छा देत या अद्भुत दिवशी गुरुदेवांनी त्यांच्यासोबत बराच वेळ व्यतीत केला.












## भारतामधील विभागांची पुनर्रचना

पूज्य गुरुदेवांनी मिशनच्या विभागांची पुनर्रचना केली आहे. ही रचना दि. १ जानेवारी २०१४ पासून अंमलात येत आहे. सोबतच्या नकाशामध्ये नवीन विभाग दाखविण्यात आले आहेत. खाली दिलेल्या तक्त्यामध्ये या विभागांची विस्तृत माहिती व विभाग–प्रमुखाचे नाव देण्यात आले आहे.

| विभाग | विभागाचे नाव | विभाग–प्रमुख | नियोजित ई–मेल आय डी |
|---|---|---|---|
| १ | हैदराबाद महानगर | श्री. उल्हास राव कुंबळे (हैदराबाद) | zic.ap1@srcm.org |
| १अ | उत्तर आंध्र प्रदेश | श्री. मधुसूदनराव कोथापल्ली (हैदराबाद) | zic.ap1a@srcm.org |
| १ब | तटीय उत्तर आंध्र प्रदेश | श्री. आदिनारायणा मोगंती (विशाखापटटणम) | zic.ap1b@srcm.org |
| १क | तटीय दक्षिण आंध्र प्रदेश | श्री. एम.आर. गंगाधर(नेल्लोर) | zic.ap1c@srcm.org |
| १ड | दक्षिण आंध्र प्रदेश | श्री. गंगाधरा दोन्तिरेड्डी (हैदराबाद) | zic.ap1d@srcm.org |
| २ | चेन्नई महानगर | कॅप्टन विनीत सिंग राणावत (चेन्नई) | zic.tn2@srcm.org |
| २अ | उत्तर तमिळनाडू | श्री. बी. एस. मुरुगन(होसूर) | zic.tn2a@srcm.org |
| २ब | पूर्व तमिळनाडू | श्री. टी. एस. रघुराम (तिरुचिरापल्ली) | zic.tn2b@srcm.org |
| २क | पश्चिम तमिळनाडू | श्री. टी. व्ही. विश्वनाथा राव (तिरुप्पुर) | zic.tn2c@srcm.org |
| २ड | दक्षिण तमिळनाडू | श्री. रामनाथन रामचंद्रा (मदुराई) | zic.tn2d@srcm.org |

पुढे चालू...

## भारतामधील विभागांची पुनर्रचना (पुढे चालू)

| विभाग क्रमांक | विभागाचे नाव | विभाग–प्रमुख | नियोजित ई–मेल आय डी |
|---|---|---|---|
| ३अ | दक्षिण केरळ | श्री. के.यु. मोहन (त्रिसुर) | zic.kl3a@srcm.org |
| ३ब | उत्तर केरळ | श्री. ए.के. मोहनदास (पलक्कड) | zic.kl3b@srcm.org |
| ४ | बेंगलोर महानगर | श्री. गिरिश तोतलूर (बेंगलोर) | zic.ka4@srcm.org |
| ४अ | उत्तर कर्नाटक | श्री. गजेंद्र सिंह (गुलबर्गा) | zic.ka4a@srcm.org |
| ४ब | दक्षिण कर्नाटक | श्री. मधुसूदन कृष्णस्वामी (म्हैसूर) | zic.ka4b@srcm.org |
| ४क | तटीय कर्नाटक | श्री. सुब्रया पै (विटटल) | zic.ka4c@srcm.org |
| ५ | मुंबई महानगर | श्री. तुषार प्रधान (मुंबई) | zic.mh5@srcm.org |
| ५अ | पश्चिम महाराष्ट्र | श्री. सुभाष वैद्य (पुणे) | zic.mh5a@srcm.org |
| ५ब | मध्य महाराष्ट्र | श्री. अरुण कुमार चव्हाण (औरंगाबाद) | zic.mh5b@srcm.org |
| ५क | विदर्भ महाराष्ट्र | श्री. राजेंद्रन रथिनम (पुलगाव) | zic.mh5c@srcm.org |
| ६अ | उत्तर गुजरात | श्री. राजेश अग्रवाल (अहमदाबाद) | zic.gj6a@srcm.org |
| ६ब | दक्षिण गुजरात | डॉ. सुरेंद्र आर. अग्रवाल (सुरत) | zic.gj6b@srcm.org |
| ७अ | पश्चिम राजस्थान | श्री. विकास मोघे (जोधपुर) | zic.rj7a@srcm.org |
| ७ब | पूर्व राजस्थान | श्री. मधुकर कोचर (जयपूर) | zic.rj7b@srcm.org |
| ८अ | पश्चिम मध्य प्रदेश | श्री. नविन मिश्रा (उज्जैन) | zic.mp8a@srcm.org |
| ८ब | पूर्व मध्य प्रदेश | मेजर जनरल (निवृत्त) आनंद नारायण मुद्रे (जबलपूर) | zic.mp8b@srcm.org |
| ९ | नवी दिल्ली महानगर | श्री. सुधीर मारवाह (नवी दिल्ली) | zic.dl9@srcm.org |
| १० | पंजाब | मेजर जनरल (निवृत्त) हरभजन सिंह (चंदिगढ) | zic.pb10@srcm.org |
| ११अ | जम्मु व काश्मीर | श्री. सुरेंदर शर्मा (जम्मु) | zic.hpjk11@srcm.org |
| ११ब | हिमाचल प्रदेश | श्री. सुरेंदर शर्मा (जम्मु) | zic.hpjk11@srcm.org |
| १२अ | पश्चिम उत्तर प्रदेश | श्री. अशोक कुमार गर्ग (मीरत) | zic.up12a@srcm.org |
| १२ब | शहाजहानपूर उत्तर प्रदेश | श्री. प्रभात कुमार सिन्हा (बांके गंज) | zic.up12b@srcm.org |
| १२क | लखनऊ उत्तर प्रदेश | श्री. आशिष कुमार सिंह (कानपूर) | zic.up12c@srcm.org |
| १२ड | अलाहाबाद उत्तर प्रदेश | श्री. आशिष कुमार सिंह (कानपूर) | zic.up12d@srcm.org |
| १२ई | पूर्व उत्तर प्रदेश | श्री. अवदेश सिंह (गोरखपूर) | zic.up12e@srcm.org |
| १३ | कोलकाता पश्चिम बंगाल | श्री. अजय कुमार भट्टर (कोलकाता) | zic.wb13@srcm.org |
| १४ | ओडिशा | श्री. गंदर्भ बेहेरा (भुवनेश्वर) | zic.or14@srcm.org |
| १५ | अरुणाचल प्रदेश, पूर्व आसाम, नागालँड | श्री. ईश्वर प्रसाद (तिनसुखिया) | zic.arnl15@srcm.org |
| १६ | मेघालय, पश्चिम आसाम, त्रिपुरा, मणिपूर, मिझोराम | श्री. धानी चंद (गौहाती) | zic.as16@srcm.org |
| १७ | बिहार | श्री. मनोज तिवारी (रांची/ कोलकाता) | zic.brjh17@srcm.org |
| १८ | उत्तराखंड | श्री. भूपेंद्र सिंह चुफाल (अल्मोडा) | zic.uk18@srcm.org |
| १९ | छत्तीसगढ | श्री. दिपक त्यागी (रायपूर) | zic.ct19@srcm.org |
| २० | झारखंड | श्री. मनोज तिवारी (रांची/ कोलकाता) | zic.brjh17@srcm.org |
| २१ | हरयाणा | श्री. सत्य नारायण मंडल (नवी दिल्ली) | zic.hr21@srcm.org |
| २२ | सिक्कीम, पश्चिम बंगाल–उत्तर | श्री. रविंद्र तेलंग (गंगटोक) | zic.si22@srcm.org |




## ऑक्टोबर २०१३

चीनी अभ्यासींसाठी आयोजलेल्या परिसंवादाच्या समारोपानंतर गुरुदेवांची प्रकृती तितकीशी बरी नसल्याने त्यांना लोकांच्या भेटी घेणे अवघड जात होते. त्यांच्या पायाला होत असलेला त्रास चालूच होता आणि त्यात सुधारणा होण्याची चिन्हे दिसत नव्हती. त्यांच्या दोन्ही टाचांचे दुखणे अद्याप बरे झाले नसल्यामुळे त्यांचे चालणे पूर्णपणे थांबले होते. दुखणे लवकर बरे व्हावे म्हणून पाय वर धरून ठेवण्यास डॉक्टरांनी त्यांना सांगितले होते.

दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळची न्याहारी व तिरुवल्लुर येथील जमिनीच्या प्रकल्पासंबंधी प्रदीर्घ चर्चा झाल्यानंतर गुरुदेवांनी आपल्या गोल्फ कार्टमधून आश्रमामध्ये जवळजवळ ४५ मिनिटे फेरफटका मारला. चौघाजणांनी सहाय्य करूनसुद्धा गोल्फ कार्टमध्ये चढ–उतार करणे गुरुदेवांना त्रासदायक होत होते.

संध्याकाळी गुरुदेव त्यांच्या कुटीराच्या मागील बाजूस असलेल्या शयनकक्षाच्या बाहेर येऊन बसत कारण उन्हात बसण्यास त्यांना हीच जागा योग्य होती.

रविवार दि. १३ ऑक्टोबर रोजी गुरुदेवांची प्रकृती  बरी नसल्याने रविवारचा सत्संग बंधू कमलेश पटेल यांनी संचालित केला. तसेच त्यांनी काही विवाहसुद्धा संपन्न केले. दसरा आठवड्याच्या शेवटच्या दिवसांना जोडून आल्यामुळे बरेच अभ्यासी आश्रमात आले होते. गुरुदेवांच्या कुटीरातील सभागृहात भगवद्गीतेवरील प्रश्नोत्तरांचे सत्र झाले. या प्रश्नांपैकी बरेचसे प्रश्न गीता व सहजमार्ग पद्धती यामधील साम्यस्थळांची ओळख पटविण्याचा प्रयत्न करण्यावर केन्द्रित झाले होते. अशा सर्व प्रश्नांची उत्तरे बंधू संस्कृत कन्नन यांनी दिली तर बंधू चक्रपाणि यांनी चर्चेचे सुसूत्रीकरण केले. या चर्चेदरम्यान, मध्येच गुरुदेवांनी ध्वनिक्षेपक (माईक) उचलला व ज्या खोलीत ते ऐकत बसले होते त्या खोलीतूनच त्यांनी आपले मत मांडण्यास सुरुवात केली. त्यांचा आवाज ऐकून सर्वांनाच आश्चर्य वाटले. ते म्हणाले, “ध्येयाकडे घेऊन जाणारा, मी अंगिकारलेला, मला माहित असलेला सर्वात खात्रीशीर मार्ग म्हणजे सेवा करणे होय.”

प्रश्नोत्तरांचे सत्र संपून सर्व समुदाय पांगल्यावर गुरुदेव त्यांच्या कुटीरातील सभागृहात आले व त्यादिवशी सकाळी ज्यांचे विवाह संपन्न झाले होते त्या जोडप्यांना व तेथे उपस्थित असलेल्या इतर मोजक्या अभ्यासींना ते भेटले.

दि. १६ ऑक्टोबर रोजी त्यांनी प्रशिक्षकांच्या आगामी परिषदेविषयी प्रदीर्घ चर्चा केली. ते प्रशिक्षकांच्या कामासंबंधीच नव्हे तर प्रशिक्षकांच्या जीवनासंबंधी देखील बोलत होते.

### चीनी भाषेचे धडे

एके दिवशी न्याहारी झाल्यानंतर गुरुदेव खूपच दमले होते. ते अंथरूणावर पडले होते पण त्यांना झोप येत नव्हती. दोन भगिनींनी त्यांना चीनी भाषेतील एक धडा शिकविला, आणि गुरुदेव ताजेतवाने व उत्साहित झाल्याचे सर्वांनाच दिसून आले. नंतर ते आपल्या कार्यालयात आले. वेगवेगळ्या भाषा शिकण्याची त्यांना एवढी आवड कशी निर्माण झाली असे विचारता गुरुदेव उत्तरले, “हे पहा, मला माणसे आवडतात. म्हणून मला त्यांच्याबद्दल शिकायला, त्यांच्या संस्कृतीबद्दल जाणून घ्यायला आवडते. मी त्यांच्याशी संभाषण करण्याचा प्रयत्न करतो व त्यासाठी मला त्यांची भाषा शिकावी लागते.”

एक दिवशी संध्याकाळी गुरुदेवांच्या कुटीरासमोर अभ्यासींचा बराच मोठा समूह जमला होता. उशीर झालेला होता व गुरुदेव आराम करत होते. ते बाहेर येण्याची शक्यता खूप कमी होती. संध्याकाळी सात वाजता ते अचानक बाहेर आले आणि प्रत्येकाला भेटले. त्यांनी हिंदी भाषेतून सर्वांशी संवाद साधला. ते म्हणाले, “तुम्ही सर्वजण खूप दूरवरून आश्रमात आला आहात याचा मला खूप आनंद झाला आहे. बरेच अभ्यासी मणपाक्कम आश्रमात काम करण्यासाठी स्वयंसेवक म्हणून येतात. मी त्यांना असे सुचवितो की, त्यांनी प्रथम आपल्या स्वतःच्या आश्रमात काम करावे व तो स्वच्छ व नीटनेटका ठेवावा. ते तुमचे घर आहे. ते प्रथम स्वच्छ ठेवा. आंतरिक व बाह्य दोन्ही प्रकारची स्वच्छता तेवढीच महत्वाची आहे.” प्रेमाबद्दल बोलताना गुरुदेवांनी एक उदाहरण दिले, “कृष्ण जेव्हा द्वारका सोडून जायला निघाला तेव्हा राधेने केवळ तिच्यासाठी, एकटीसाठी बासरी वाजवून दाखविण्यास कृष्णाला सांगितले. त्यावर कृष्ण उत्तरला की मी नेहमीच तुझ्या एकटीसाठी बासरी वाजवितो पण इतर सर्वांनासुद्धा ती ऐकू येते”

रविवार, दि. २० ऑक्टोबर

गीतेच्या सत्रानंतर व्हीडियोलिंकद्वारे गुरुदेवांनी फ्रान्समधील नीस येथील अभ्यासींबरोबर संपर्क साधला. यावेळी बंधू पॉल जोऊल परिसंवादाविषयी व त्याच्या प्रभावीपणाविषयी बोलले. यावर गुरुदेव म्हणाले, “माझ्या मते असे परिसंवाद तुम्हाला हळूहळू पुढे नेत आहेत.” ते पुढे म्हणाले, “तुम्ही सर्वांनी आता इतरांना हीच गोष्ट



करण्यासाठी सहाय्य केले पाहिजे. मी नेहमी हेच सांगत आलो आहे की आम्ही फक्त स्वत:साठीच विकसित होत नाही. विकासाची एक शृंखला असल्यासारखे हे आहे.” अशा प्रकारच्या विकासाचा त्यांनी ‘ब्रह्मांडीय वृक्ष’ असा उल्लेख केला.अशा ब्रह्मांडीय वृक्षाला असंख्य पाने आहेत, अगणित फांद्या आहेत, मोजता येणार नाहीत इतक्या डहाळ्या आहेत, तरी पण ते सर्व एकच आहेत. ते भिन्न नसून वृक्षाचाच हिस्सा आहेत. “म्हणून, आपण हे समजून घेतले पाहिजे की ज्यामध्ये आपले रूपांतरण झाले आहे तेच आपण घडवत आहोत.” याची तुलना त्यांनी नंतर परीसाशी केली आणि म्हणाले, “माझे गुरुदेव म्हणत, परीस केवळ दुसऱ्या वस्तूंचे सोन्यात रूपांतरण करतो. मला असे काहीतरी हवे आहे की ज्यामुळे एक परीस दुसरा परीस निर्माण करेल. या अनुषंगाने माझे गुरुदेव म्हणाले–‘मी शिष्य निर्माण करीत नाही तर मास्टर निर्माण करतो.’ प्रत्येकजण मास्टर होऊ शकत नाही पण प्रत्येक जण मास्टरसारखा बनू शकतो.” शेवटी ते म्हणाले, “तुमच्या सर्वांसोबत एका दृष्टीने मी खूश आहे पण मी खूप खूश नाही कारण दुसऱ्या दृष्टीने मी तुमच्यासमवेत राहू शकत नाही.” नंतर गुरुदेव म्हणाले, “मी तुमच्यासोबतच आहे. माझ्यावर विश्वास ठेवा, माझ्या हृदयात मी तुम्हासर्वांसोबत आहे.”

आपल्या स्वास्थ्याविषयी बोलताना गुरुदेव म्हणाले– मला जरी बरे वाटत नव्हते आणि मी उशीरा उठलो, तरी मी स्वत:ला प्रयत्नपूर्वक सज्ज केले आणि तयार झालो, न्याहारी केली व व्हील–चेअरमध्ये बसून बाहेर आलो. ते पुढे म्हणाले, “आणि आता बघा, तुम्ही मला पूर्वीसारखा ताजातवाना पाहत आहात. जर मी हे करू शकतो तर तुम्हीही हे करू शकता. आता कोणतेही आजारपण नाही की थकव्याच्या तक्रारी नाहीत. तुम्ही जेव्हा थकलेले असता, उठा. जेव्हा तुम्ही निराश असता तेव्हा नैराश्याला झटका. जर तुम्ही त्याच स्थितीत राहिलात तर ते धोकादायक आहे. मनाची शक्ती वापरुन शरीराच्या तक्रारींवर मात करा !”

## चेन्नईत पर्जन्यवृष्टी

दि.२१ ते २३ ऑक्टोबर दरम्यान चेन्नईमध्ये मुसळधार पाऊस पडत होता व गुरुदेवांना श्वास घेण्यास थोडासा त्रास होत होता. सकाळच्या न्याहारीनंतर त्यांची प्रकृती एकदम खालावली व त्यांना प्राणवायु देण्याची गरज भासली. त्यादिवशी तीन बैठका निश्चित करण्यात आल्या होत्या. गुरुदेवांनी सुचविले की ते तिघांनाही एकाच वेळी एकत्र भेटतील. पण अखेर ते सर्व वेगवेगळ्या वेळेसच आले. फ्रेंच अभ्यासी आले व गुरुदेवांनी अभ्यासींना संबोधित करावे यासाठी फ्रान्समधील तीन आश्रम व मणपाक्कम आश्रम अशी चौपदरी व्हीडियो कॉन्फरन्स घेण्याच्या प्रस्तावावर त्यांनी चर्चा केली.

नंतर गुरुदेव बाहेर आले व प्रशिक्षण घेत असलेल्या समन्वयकांसमोर त्यांनी भाषण केले. त्यांना संबोधित करताना ते म्हणाले की खोटी नम्रता टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे तसेच विनयशीलता, औदार्य व साधेपणा या सारखे गुण निसर्गत:च अभ्यासींच्या जीवनाचे अविभाज्य घटक बनले पाहिजेत. सहजमार्ग साधनेच्या सर्व पैलूंवर अभ्यासींनी लक्ष केन्द्रित केले पाहिजे, यावर त्यांनी जोर दिला. भाषणानंतर जेव्हा गुरुदेवांनी सिटींग देण्याचा निर्णय घेतला तेव्हा सर्व प्रशिक्षक उमेदवारसुद्धा आत येऊन गुरुदेवांसमोर बसले. ३५ मिनिटांच्या सिटींगनंतर गुरुदेवांना धाप लागली होती.

## प्रशिक्षक उमेदवारांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा

प्रशिक्षक उमेदवारांचा एक गट दोन आठवड्याच्या प्रशिक्षण कार्यशाळेसाठी आला होता. आता एक नवीन पद्धत सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार विविध केन्द्रांतून शिफारस करण्यात आलेले प्रशिक्षक उमेदवार कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी येतात व कार्यशाळेच्या शेवटी त्यांना प्रशिक्षक बनविण्यात येते. दुसऱ्या आठवड्यात बावीस सहभागी प्रशिक्षणार्थी गुरुदेवांना भेटू शकले. प्रशिक्षक हे सुद्धा प्रथमतः अभ्यासीच असतात व त्यांनी सहजमार्गाच्या तत्वांचे कठोरपणे पालन करणे ही प्रशिक्षकांसाठी केवळ बांधिलकीच आहे असे नव्हे, तर तो त्यांनी लिहून दिलेला एक ‘करारनामा’ आहे, यावर गुरुदेवांनी भर दिला. त्यांनी विचारले की, “उमेदवारांपैकी किती जण खरोखरीच नियमितपणे साधना करीत








आहेत?" त्यानंतर त्यांनी प्रशिक्षणार्थींना एक तासाचे सिटींग दिले.

**अभ्यासींसोबत**

हल्ली गुरुदेव बऱ्याचदा त्यांच्या शयनकक्षाच्या मागील बाजूस उन्हात बसून न्याहारी करतात. एकदा ते गप्पा मारण्याचा मनःस्थितीत (मूडमध्ये) होते. ते म्हणाले, "जेव्हा जीएसटी चालू होती तेव्हा मला मिशनच्या कामापासून दूर ठेवण्यात येत आहे असे वाटत होते. बाहेर काय चालले आहे याची मला कल्पना नव्हती. अशा गोष्टींमुळे मला त्रास होऊ नये हाच त्यामागचा उद्देश होता. पण मला त्रास झाला तरी हरकत नसते" गुरुदेव असे सुद्धा म्हणाले की त्यांना नियमितपणे अभ्यासींना भेटायची इच्छा असते. "दिवसभर या शयनगृहात फक्त डॉक्टरांच्या गराड्यात मला जेव्हा बंदिस्त करण्यात येते तेव्हा मला खूप एकाकी वाटते."

संध्याकाळच्या सत्संगानंतर गुरुदेवांनी सर्व परदेशी अभ्यासींना बोलावले आणि कुटीराच्या बाहेर त्यांची भेट घेतली. ही सर्वसाधारण स्वरूपाची चर्चा होती जी सुमारे तीस मिनिटे चालली. अचानक गुरुदेव शांत झाले. आणि एकदम सर्व वातावरण संपूर्णपणे स्तब्ध व शांत झाले कारण सर्व अभ्यासीसुद्धा पूर्णतः निःशब्द झाले. एवढेच काय, निसर्गाने सुद्धा त्यात सहयोग दिला. त्यामुळे जवळपास १५-२० मिनिटे सर्वत्र संपूर्ण नीरवता पसरली होती. त्यानंतर गुरुदेव फ्रान्समधील मिशनसंबंधी बोलू लागले.

## नोव्हेंबर २०१३

**कार्यकारिणीची सभा**

दिवाळीच्या पूर्वसंध्येला गुरुदेवांच्या कुटीरामध्ये मिशनच्या कार्यकारिणीची बैठक संपन्न झाली. बैठकीच्या आधी त्यांच्यापैकी काही जण गुरुदेवांना त्यांच्या कार्यालयात भेटले. बंधू जॅकी यांनी सीता वनात जात असल्याचा दृष्टांत एका ऋषीला झाला होता त्यासंदर्भात गुरुदेवांना विचारले की, 'ते सीतेचा भविष्यकाळ बदलू शकले नसते का? आणि तिची शोकांतिका टाळू शकले नसते का?' गुरुदेव म्हणाले, "जोपर्यंत श्रीरामाचे तसे नियोजन नव्हते तोपर्यंत ऋषी ते टाळू शकले नसते." दुसरे म्हणजे आपण सगळे आपले काही संस्कार घेऊनच या पृथ्वीतलावर जन्म घेत असतो. आणि या भौतिक जगात जे काही घडते ते आपण टाळू शकत नाही. जेव्हा आपण उत्क्रांतीबद्दल बोलतो, तेव्हा आपण आध्यात्मिक उत्क्रांतीविषयी अधिक बोलत असतो, भौतिक उत्क्रांती नव्हे, जी कोणत्याही परीस्थितीत नैसर्गिकरित्या होणार असतेच." गुरुदेव पुढे सांगत राहिले, "असे मानले जाते की राम हा अपूर्ण अवतार होता कारण त्याला आपल्या दिव्यत्वाची जाणीव नव्हती. पण भगवान कृष्णाला मात्र आपल्या दिव्यत्वाची जाणीव होती. ही उत्क्रांती चेतना शक्तीची असते व म्हणून आपण आपल्या चेतनेच्या उन्नतीसाठी प्रार्थना केली पाहिजे."

बंधू कमलेश पटेल यांनी सुमारे दोन तास सभेच्या कामकाजाची कार्यवाही संचालित केली. शेवटी त्यांनी गुरुदेवांचा आदेश वाचून दाखवला की प्रत्येक वर्षी कार्यकारिणीतील एक तृतीयांश सदस्य निवृत्त होतील व त्यांच्या जागी नूतन सदस्य नियुक्त केले जातील. त्याच वेळी गुरुदेव आपल्या व्हीलचेअरच्या सहाय्याने बाहेर आले व त्यांनी काही समारोपाचे भाष्य करत बैठकीला समाप्त केले. त्यानंतर ते भोजनासाठी निघून गेले.

**दिवाळी उत्सवः दि. २ व ३ नोव्हेंबर, २०१३**

दिवाळीच्या दोन दिवसांदरम्यान सत्संगासाठी जवळजवळ पाच हजार अभ्यासींचा समुदाय जमला होता. आयोजकांनी त्या दृष्टीने नियोजन केले होते त्यामुळे एवढ्या मोठ्या समुदायाची व्यवस्था करण्यासाठी त्यांची तयारी होती. शनिवारी गुरुदेवांनी त्यांच्या कक्षामध्ये बऱ्याच अभ्यासींची भेट घेतली. ते अत्यंत चांगल्या मनःस्थितीत होते व त्यांनी सर्वांचे अभीष्टचिंतन केले. दोन्ही दिवशी गुरुदेवांनी सत्संग संचालित केला तर बंधू कमलेश यांनी अलीकडेच प्राप्त झालेल्या व्हिस्पर्सचे वाचन केले.

दि.५ नोव्हेंबर रोजी वडकंगुलम (जे तामिळनाडूच्या दक्षिण टोकाला वसलेले आहे) येथून आलेल्या काही अभ्यासींचे गुरुदेवांनी स्वागत

केले. तेथे बांधलेल्या व मिशनला देणगी स्वरूपात अर्पण करण्यात येत असलेल्या आश्रमाचे दस्तऐवज गुरुदेवांकडे सोपविण्यासाठी ते मणपाक्कम येथे आले होते.

दि. ८ रोजी गुरुदेवांची बंधू कमलेश यांच्याशी नीतिशास्त्र व नैतिकता या विषयावर चर्चा झाली. त्यांना मिशनच्या विरूद्ध करण्यात आलेल्या न्यायालयीन दाव्यांविषयी चिंता लागून राहिली होती. त्यांच्या उत्तराधिकाऱ्याला त्यांच्या माघारी अशा गोष्टींचा सामना करावा लागू नये असे त्यांना वाटत होते.

**ओमेगाच्या मुलांसमवेत**

शनिवार, दि.९ नोव्हेंबरच्या सायंकाळी गुरुदेव फुटबॉल स्पर्धा जिंकून पुढील पातळीवर राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी जाणाऱ्या ओमेगाच्या विद्यार्थ्यांना भेटले. त्यांनी त्या मुलांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.



ते मुलांना म्हणाले, “कोणताही क्रीडाप्रकार हा फक्त खेळापुरताच मर्यादित असला पाहिजे. ‘नेहमी जिंकलेच पाहिजे’ हा एकच निकष नसावा. जेव्हा दोघे खेळतात, तेव्हा एकाचे हरणे अनिवार्य आहे. परंतु स्पर्धात्मक भावना ही सर्वात महत्वाची आहे.”

**फ्रेंच परिसंवाद**

रविवार दि.१० नोव्हेंबर रोजी गुरुदेव नीस, मॉन्टपेल्लिए आणि पॅरिस येथील अभ्यासींना एकाचवेळी पाहू शकले. गुरुदेव बरेच प्रभावित झाले व म्हणाले की, मला अशी आशा वाटते की भविष्यात एके दिवशी मी बऱ्याच आश्रमांना एकाच वेळी पाहू शकेन आणि त्याच वेळी त्या सर्वांना संबोधितसुद्धा करु शकेन. एक छोटे भाषण व सत्संगानंतर हे सत्र समाप्त झाले. सायंकाळी हा कार्यक्रम प्रेक्षागृह संकुलामध्ये पुढे चालू झाला. बंधू कमलेश यांनी या तीन फ्रेंच आश्रमातील अभ्यासींशी संवाद साधला. या प्रश्नोत्तरांच्या सत्रादरम्यान बंधू कमलेश यांनी सुमारे दहा प्रश्नसंचांची उत्तरे दिली.

**बंधू माधवा यांचे घरी**

दि ११ ते दि १८ नोव्हेंबर दरम्यान गुरुदेवांचा मुक्काम बंधू माधवा यांच्या आश्रमाच्या पाठीमागील घरामध्ये होता. गुरुदेवांसाठी हा एक बदल होता व गुरुदेव अगदी आनंदात होते. दि. ११ रोजी सायंकाळी गुरुदेवांसाठी एका खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रशियन संघराज्याचे महावाणिज्यदूत श्री. निकोलाय यांनाही आमंत्रित करण्यात आले होते व त्यांचा पाहुणचार व्यवस्थित होईल याकडे गुरुदेवांनी विशेष लक्ष दिले. एका रशियन कलाकाराने ‘रशियन सिंगिंग बेल्स’ नावाचा कलाप्रकार सादर केला. त्यामध्ये घंटांचा वापर करून व विविध आकारांच्या



पितळेच्या तबकड्यांमधून संगीत निर्माण केले जात होते.

बंधू माधवांच्या घरी सकाळी गुरुदेव त्यांचे काम करीत असत व त्यानंतर उपस्थित काहीजणांसाठी सिटींग होत असे. गुरुदेवांच्या विश्रामानंतर सायंकाळी गुरुदेव बाहेरील केंद्रांमधून मोठ्या संख्येने आलेल्या अभ्यासींना सिटींग देत असत. त्यांच्याशी भेट झाल्यानंतर ते फिजिओथेरेपी (भौतिकोपचार) सत्रासाठी आपल्या शयनकक्षामध्ये जात. गुरुदेवांना नितांत गरजेची अशी विश्रांती मिळाली व अभ्यासींसमवेत वेळही व्यतीत करता आला. दि १८ नोव्हेंबर रोजी ते आश्रमामध्ये परतले.

**पुन्हा नियमित दिनचर्येकडे**

शनिवार, दि. १३ नोव्हेंबर २०१३: गुरुदेव सकाळच्या वेळी आपल्या कामामध्ये व चर्चांमध्ये व्यस्त होते. अभ्यासींना एकाचवेळी अनेक पुस्तके विकत घेणे अवघड वाटू नये याकरीता (मिशनच्या) पुस्तकांचे प्रकाशन वर्षभरामध्ये एकसमान कालावधीत करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला.

यानंतर चर्चेचा रोख पुढील वर्षामधील पूज्य लालाजी महाराज व पूज्य बाबूजी महाराज यांचे जन्मदिन समारंभ तिरुप्पुरमध्ये व




गुरुदेवांचा जन्मदिवस तिरुवल्लुर येथील नुकत्याच घेतलेल्या जागी साजरा करण्याचे ठरविले गेले.

**प्रवास करण्याची उत्कट इच्छा**

पुन्हा प्रवास करण्यास गुरुदेव अतिशय उत्सुक आहेत. बंधू कमलेश पटेल व इतरांसोबतच्या बैठकींच्या वेळी त्यांची ही तीव्र इच्छा स्पष्टपणे दिसून येते. बंधू कमलेश यांना ते म्हणाले, “ मी जेव्हा पूर्ण बरा होईन तेव्हा तुम्ही व मी वडकानगुलम येथे जाऊया. आता मी ठीक आहे पण मी आजारी पडण्यापूर्वी ज्याप्रमाणे कोणाचा तरी हात धरून, काठी घेऊन चालायचो त्याप्रमाणे मला चालता आले पाहिजे.” त्यांनी प्रवासाच्या वेगवेगळ्या पर्यायांचा विचार केला व शेवटी त्यांनी मोटारगाडीने प्रवास करण्याचा पर्याय निवडला आणि जाण्याच्या मार्गाची आखणी केली.

आणखी एका प्रसंगी ते मिन्स्कला जाण्याविषयी बोलले. गुरुदेवांनी त्यांच्यासोबत येणाऱ्या लोकांची यादी बनवली. ते म्हणाले की मला शहाजहानपूरलासुद्धा जायचे आहे, पण गर्दीला आवरणे मुश्किल होईल म्हणून जाहीर न करता जायचे आहे.

**कामाविषयी तळमळ**

गुरुदेवांची हीच तडफ त्यांना ढीगभर कामे अविश्रांतपणे आपल्या अंगावर घेण्यास भाग पाडते. कोणताही अधिकारी न नेमता एस. एम. एस. एफ. चे काम ते स्वतःच का करतात, असे विचारल्यावर ते म्हणाले, “मी सर्व काही करू शकतो”. ते पुढे म्हणाले, “मी काम करतो आहे म्हणूनच केवळ मी जिवंत आहे. कामाशिवाय पाच वर्षांपूर्वीच माझा मृत्यु झाला असता.”

**गुरुदेवांचा अलिकडील प्रकल्प – तिरूवल्लूर**

गुरुदेवांनी तिरूवल्लूर मधील मालमत्तेची (११३एकर) देखभाल करण्यासाठी आणि जुलै २०१४ मधील त्यांच्या जन्मदिवस सोहळ्याचे आयोजन करण्यासाठी बंधू पी. आर. कृष्णा यांना नियुक्त केले आहे. एस.एम.एस.एफ. च्या उपक्रमांकरीता पायाभूत सुविधांचा विकास तसेच मुबलक पाण्याचा साठा असणाऱ्या ठिकाणी सुपीक जमिनीत केली जाणारी शेती यांवर गुरुदेव देखरेख करत आहेत.

सहज संदेश क्र. २०१३.५४

बुधवार, दि. १८ डिसेंबर २०१३.

प्रिय बंधू आणि भगिनींनो,

या वर्षी (२०१४), ३ प्रमुख समारंभांचे नियोजन करण्यात आले आहे, ते म्हणजे– लालाजी महाराजांचा जन्मदिवस सोहळा दि. २ फेब्रुवारी रोजी (४ दिवस–१, २, ३ आणि ४ फेब्रुवारी), बाबूजी महाराजांचा जन्मदिवस सोहळा –दि. २९, ३० एप्रिल आणि १ मे. हे दोन्ही समारंभ डी.जे.पार्क, तिरुप्पुर, भारत येथे संपन्न होतील. सध्याच्या अध्यक्षांचा जन्मदिवस समारंभ भारतातील चेन्नई जवळील तिरूवल्लूर येथे दि. २३,२४ व २५ जुलै या दिवशी साजरा करण्यात येईल. शेवटी निर्देशित करण्यात आलेला समारंभ तिरूवल्लूर येथील नुकत्याच घेण्यात आलेल्या शेत जमिनीवर साजरा करण्यात येणार आहे. शेत जमिनीच्या रुपांतराची प्रक्रिया सुरू आहे.

सध्याच्या या महागाईच्या दिवसात मी असे सुचवितो की अभ्यासींनी या तीन पैकी एक सोहळा निवडावा आणि शक्य तितक्या लवकर नोंदणी करावी ज्यामुळे प्रत्येक समारंभाच्या ठिकाणी किती अभ्यासी येणार आहेत याची आम्हाला कल्पना येईल.

जो अभ्यासी तीनही समारंभात सामील होऊ इच्छितो, त्याला त्याच्या कुटूंबियांनासुद्धा सोबत आणणे फार अवघड वाटू शकेल. यामुळे (तीनपैकी एका समारंभाची निवड केल्यामुळे) अभ्यासींना आपल्या कुटूंबियांसोबत समारंभात सहभागी होता येईल. हे लक्षात घेऊन कृपया या विनंतीचा गंभीरपणे विचार करा व लवकरात लवकर यापैकी एका समारंभासाठी नोंदणी करा.

ज्या अभ्यासींना यापैकी कोणत्याही समारंभाला उपस्थित राहणे शक्य नसेल ते त्यांच्या केंद्रातील सोहळ्यात सहभागी होऊ शकतात. तेथे समारंभ फक्त एकाच दिवसाचा असेल तो म्हणजे दि. २ फेब्रुवारी, ३० एप्रिल आणि २४ जुलै. नेहमीप्रमाणेच अभ्यासींना विनंती आहे की त्यांनी शक्य असेल तर या समारंभात सहभागी होण्यासाठी जवळच्या आश्रमात जावे. अन्यथा, सध्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता तुम्ही स्वतःच्या घरी राहिलात तरीही चालेल.

सर्वांना आशीर्वाद.

पी. राजगोपालाचारी.

**नवीन नेमणूका**

बंधू पूरनमल बैंधा

आश्रम व्यवस्थापक, जयपूर.

## प्रशिक्षक बैठका

### नविन प्रशिक्षकांसाठी कार्यशाळा, मणपक्कम



प्रशिक्षकांकडून मिळणाऱ्या सेवेचा दर्जा (गुणवत्ता) उंचावण्यासाठी, त्यांच्या प्रशिक्षण आणि सिद्धतेसाठी पूज्य गुरुदेवांनी एका नविन प्रक्रिया सुरुवात केली आहे. या प्रक्रियेमध्ये प्रशिक्षणार्थींना दोन आठवडे चालणाऱ्या कार्यक्रमामध्ये सहभागी केले जाते. यादरम्यान त्यांना सखोल ज्ञान, बांधिलकी आणि उद्देशाविषयी सुस्पष्ट जाणिव करुन देत सुसज्ज केले जाते. प्रत्येकी बावीस प्रशिक्षणार्थींच्या दोन गटांनी हे प्रशिक्षण ऑक्टोबर व डिसेंबर मध्ये मणपाक्कम येथे पूर्ण केले आणि त्यांना प्रशिक्षक म्हणून सेवा करण्याची अनुज्ञा मिळाली. हे प्रशिक्षणार्थी देशाच्या विविध भागांमधून आले होते आणि अनेक तर अशा केन्द्रांमधून आले होते जिथे एकही प्रशिक्षक नाही. गुरुदेवांनी स्वत:चा वेळ प्रशिक्षणार्थींना देत त्यांना सिटींग्स दिली, त्यांच्याशी संवाद साधला आणि प्रशिक्षक म्हणून त्यांच्या भावी जीवनासाठी त्यांना तयार केले.

### लखनऊ, उत्तर प्रदेश

दि.२० ते २४ नोव्हेंबर दरम्यान लखनऊ येथे बाबूजी मेमोरियल आश्रमामध्ये आयोजित ‘प्रशिक्षकांच्या अनुभवांची व्याप्ती कशी वाढवावी’ या कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय राजधानी क्षेत्र (एन.सी.आर.), उत्तराखंड, उत्तर प्रदेश (पश्चिम), उत्तर प्रदेश (मध्य) या चार विभागांमधून सुमारे अठ्ठ्याऐंशी प्रशिक्षकांनी भाग घेतला. या कार्यक्रमात केवळ व्याख्याने ऐकण्यापेक्षा आत्मपरिक्षण आणि आपापल्या अनुभवांची देवाण–घेवाण करण्यावर भर देण्यात आला. सहभागींना आत्मपरिक्षण आणि विषयाचे आकलन होण्यासाठी गुरुदेवांच्या विविध भाषणांची मदत घेण्यात आली. सहभागींच्या खुललेल्या चेहऱ्यांवरुन कार्यक्रमाचा उत्तम परिणाम झाल्याचे दिसून येत होते. सर्वांनी परिपूर्ण मानव, उत्तम अभ्यासी आणि आदर्श प्रशिक्षक बनण्याचा संकल्प केला.

### सोनीपत, हरयाणा

दि. १० नोव्हेंबर २०१३ रोजी सोनीपत आश्रम, हरयाणा येथे तेरा प्रशिक्षकांकरीता एक बैठक आयोजित करण्यात आली होती. बंधू कमलेश पटेल यांसोबत झालेल्या विभागप्रमुखांच्या बैठकीदरम्यान मांडण्यात आलेल्या मुद्द्यांवर, विभागप्रमुखांनी या बैठकीमध्ये चर्चा केली. ही बैठक दुपारी १ वाजेपर्यंत सुरु होती आणि भोजनानंतर सर्वजण परतले.

### लुधियाना, पंजाब

दि. १७ नोव्हेंबर रोजी लुधियाना येथे पंजाब, चंदिगड, अंबाला आणि मंडि डब्वाली येथील प्रशिक्षकांची बैठक झाली. सुमारे वीस प्रशिक्षक या बैठकीसाठी उपस्थित होते. विभागप्रमुख बंधू निवृत्त मेजर जनरल हरभजनसिंग हे बैठकीचे अध्यक्ष होते. विभागप्रमुखांनी आपल्या भाषणामध्ये विभागातील अभ्यासी आणि प्रशिक्षकांना प्रोत्साहन देणाऱ्या आणि सक्रिय बनवू शकतील अशा मुद्द्यांवर भर दिला. याविषयी चर्चा करताना ते म्हणाले की विविध प्रकारचे स्वयंसेवी कार्य, प्रशिक्षण कार्यक्रम, साहित्य वाचन, मासिक प्रशिक्षक बैठक तसेच मिशनचे मुलांसाठीचे उपक्रम यामध्ये प्रशिक्षकांनी सहभागी व्हावे. तसेच इतरांना (आसपासचा परिसर आणि लोक) आपल्या विचारांच्या कक्षेत घेऊन आपले मनोगत व्यक्त करता येईल अशा अनौपचारिक बैठकी घेण्यात याव्यात. विभागप्रमुखांनी दिलेला संदेश सहभागींनी उत्तम रितीने ग्रहण केला.





## अधिकाऱ्यांचा दौरा

### विभाग प्रमुखांची दक्षिण तामिळनाडूतील केंद्रांना भेट

दि. १९ ऑक्टोबर रोजी बंधू एन. प्रकाश आणि विभाग प्रमुख बंधू टि. व्ही. विश्वनाथ राव हे श्रीविल्लीपुथुर येथे पोहोचले. त्यांनी इतर





अभ्यासींसह वृक्षारोपण केले. यानंतर केंद्राचा विकास करण्याबाबत आवश्यक उपाययोजनांसंदर्भात चर्चा करण्यात आली. प्रशिक्षकांच्या गटासोबत त्यांनी कलसलिंगम विद्यापीठाला भेट दिली, तिथे सुमारे सत्तर एम. बी. ए. च्या विद्यार्थ्यांसाठी खुल्या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. हे सत्र इतर सर्व महाविद्यालयांसाठी आयोजित करण्यात यावे असा प्रस्ताव विद्यापीठाचे कुलगुरु आणि प्रबंधक यांनी मांडला, तसेच त्यांनी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी सहज मार्गावर आधारीत संपूर्ण आठवडाभराचा कालावधी असणारे चर्चासत्र आयोजित केले जावे असेही सुचविले.

नंतर या चमूने राजापलायमला भेट दिली. तिथे सत्संगानंतर अनौपचारिक चर्चा झाली आणि रात्री त्यांनी विरुधनगर आश्रमाकडे प्रस्थान केले. दि. २० ऑक्टोबर रोजी सकाळच्या सत्संगानंतर, विरुधनगर आणि अरुप्पुकोटटाई केंद्रांमधील अभ्यासींसमवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमधील चर्चेमध्ये प्रामुख्याने 'आश्रमाच्या वातावरणाची देखभाल' या विषयावर भर देण्यात आला. सुमारे ११ वाजता बंधू प्रकाश आणि बंधू राव यांनी तिरुप्पुरकडे प्रस्थान केले.

### सहसचिवांची दक्षिण तामिळनाडूला भेट

दि. २२ नोव्हेंबर रोजी, बंधु ए.पी. दुरै (सहसचिव) यांनी मनमदुरै, सिवागंगई आणि मेलुर केन्द्रांना भेट दिली. तिथे त्यांनी सत्संग संचालित केला आणि परस्परसंवादी सत्रांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि साधनेसंबंधी अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी अभ्यासींना प्रोत्साहित केले.

दि. २३ नोव्हेंबर रोजी, त्यांनी श्रीविल्लीपुथुरला भेट दिली आणि सत्संगानंतर, साधना करीत असताना धर्म, भाषा, जात, पंथ, संस्कृति इत्यादिपासून दूर रहावे असे आपल्या भाषणात सांगितले. त्यांनी अभ्यासींना साधना आणि सतत स्मरण याविषयांवर बोलण्यासाठी प्रोत्साहन दिले. सुमारे वीस मुमुक्षूंसाठी आयोजित करण्यात आलेल्या खुल्या सत्राला उपस्थित राहाण्यासाठी, त्यांनी दुपारी ४ वाजता सेथुनारायणपुरम या पाश्चिम घाटाच्या पायथ्याशी वसलेल्या छोटया गावाला भेट दिली. पैरैयुर या उपकेंद्राकडे प्रस्थान केले आणि तिथे परस्परसंवादी सत्र तसेच सत्संग संचालित केल्यानंतर ते मदुराईला परतले.

दि. २४ रोजी मदुराई आणि जवळपासच्या केंद्रांमधून जमलेल्या सुमारे ५६० अभ्यासींसाठी त्यांनी सत्संग संचालित केला. तिथे सकाळी 'पिक अँड टॉक' (पूर्व तयारीविना भाषण) आणि गटचर्चा ही सत्रे झाली.



दुपारी त्यांनी युवा सदस्यांना, सहजमार्गाच्या प्रसाराच्या आणि त्यांच्या केंद्रांच्या प्रगतीच्या आराखड्यविषयी विचार व्यक्त करण्यास सांगितले. त्यांनी पूर्ण दिवसीय कार्यक्रमाचा समारोप सत्संगाने केला.

### बंधू राजेश राठोड यांची उत्तर कर्नाटकाला भेट

दि. १५ ते १७ नोव्हेंबर दरम्यान बंधू राजेश राठोड यांनी विभाग ४–अ (उत्तर कर्नाटक)मधील रायचुर, शोरापुर, सेडम, हुमणाबाद, बिदर आणि गुलबर्गा या ठिकाणांना भेट दिली. सहा अभ्यासींच्या गटासोबत त्यांनी ह्या केंद्रांना भेट दिली, सत्संग संचालित केले आणि अभ्यासींना संबोधित केले.

दि. १७ नोव्हेंबर रोजी गुलबर्गा आश्रमामध्ये गुलबर्गा आणि लगतच्या उपकेंद्रामधील सुमारे २५० अभ्यासींकरीता पूर्ण दिवसीय कार्यक्रम आयाजित करण्यात आला होता. यावेळी तीन सत्संग झाले. बंधू राजेश यांनी श्रोत्यांना संबोधित केले. यानंतर अभ्यासींसमवेत परस्परसंवादी सत्र तसेच प्रशिक्षकांची बैठक घेण्यात आली. सर्व केन्द्रांमधील अभ्यासींनी या कार्यक्रमात आपल्याला सहभागी होता आले याबद्दल त्यांना झालेला आनंद व्यक्त केला. बऱ्याच जणांना गुरुदेवांच्या अस्तित्वाने आणि प्रेमाने वातावरण भरुन गेल्याचे जाणवले.



## येम्मिगनुर आश्रमाचे उदघाटन, आं.प्र.



दि. ३ नोव्हेंबर रोजी, दिवाळीच्या दिवशी, आदरणीय गुरुदेवांनी येम्मिगनुर आश्रमाचे उदघाटन केले. हा आश्रम आंध्र प्रदेशातील कुरनुल जिल्ह्यात आहे. या आश्रमाची पायाभरणी बंधू अजय भट्टर यांनी सन २००७ मध्ये केली होती. आश्रमाची जागा जवळजवळ २.५ एकर असून त्या सभोवती सात फूट उंचीच्या भिंतीचे कुंपण आहे. या आश्रमामध्ये सुमारे ४०० अभ्यासींची क्षमता असणारे ध्यानगृह असून एक स्वयंपाकघर आणि प्रसाधनगृहदेखिल आहे. हा आश्रम अदोनी रोडवर असून तेथे रस्त्याने तसेच रेल्वेने जाणे सोयीचे आहे. आश्रमाच्या सभोवती अभ्यासींच्या वसाहतीसाठी सहा एकर जागा आहे. आश्रमाच्या बांधकामाने गुरुदेव अतिशय प्रसन्न झाले होते व त्यांनी स्थानिक अभ्यासींनी केलेल्या कामाचे कौतुक केले होते.

## विभागीय संमेलन, उ. कर्नाटक



दि. २७ ऑक्टोंबर रोजी बसवकल्याण येथील शिवयोगी महाविद्यालयात संपन्न झालेल्या विभागीय संमेलनास बसवकल्याण, बिदर, हुमणाबाद, भालकी, थनकश्नूर आणि गुलबर्गा येथील १४० अभ्यासी उपस्थित होते. स्थानिक अभ्यासींना प्रोत्साहित करणे आणि मिशनचा व्यापक अनुभव देणे हा या संमेलनामागचा उद्देश होता. सकाळच्या सत्संगानंतर काही अभ्यासींची भाषणे झाली. त्यानंतर अभ्यासी आणि लहान मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

दुपारी ३५ मुमुक्षुंच्या उपस्थितीत एक खुले सत्र आयोजित करण्यात आले होते. दुपारच्या जेवणानंतर गुरुदेवांच्या काही ध्वनिचित्रफीती दाखविण्यात आल्या. यानंतर प्रश्नोत्तराचे एक सत्र झाले ज्यामध्ये अभ्यासींनी उपस्थित केलेल्या सर्वसाधारण शंकांचे निरसन केले गेले. या कार्यक्रमाचे आयोजन बसवकल्याणच्या अभ्यासींनी केले होते व हा कार्यक्रम अतिशय परिणामकारक होता.

## लहान मुलांचे कार्यक्रम, तुमकुंटा, आं.प्र.

दि. ६ आणि २७ ऑक्टोबर या दिवशी युवा अभ्यासींच्या एका गटाने पंचेचाळीस मुलांसाठी विभागीय आश्रमात पूर्ण दिवसाचे कार्यक्रम आयोजित केले होते. दि. ६ रोजी उपस्थितांना संबोधित करताना केंद्रप्रमुख म्हणाले की आश्रम ही अशी जागा आहे जेथे सर्व मुले बंधुत्वाच्या वातावरणात एकत्र वाढली पाहिजेत. त्यांनी या दरम्यान मौज करतांना आश्रमाच्या नियमांचा आदर राखण्याची विनंती केली. मुलांनी आश्रमाच्या विविध विभागांना भेट दिली आणि स्वयंसेवकांशी संवाद साधला. त्यामुळे त्यांना आपलेपणाची जाणीव झाली. त्यानंतर एक नाटुकले आणि ट्रेझर हंट हा खेळ झाला.

दि. २७ रोजी झाडांबद्दल थोडक्यात महिती दिल्यानंतर लहान मुलांना प्रेमाने रोपटी लावताना बघणे हे अतिशय आनंददायी होते. गुरुदेवांनी ओमेगा येथे केलेले भाषण मुलांनी ऐकले अणि दुपारच्या जेवणास जाण्यापूर्वी फुग्यांसोबत नाचण्याचा (बलून डान्स) मनापासून आनंद घेतला. मुलांनी सजविलेल्या दिव्यांचे दिवाळीची भेट म्हणून नंतर अभ्यासींमध्ये वाटप करण्यात आले.

## समजून घ्या, अनुभवा आणि व्यक्त करा, बंगलोर

दि. २४ नोव्हेंबर रोजी बनशंकरी आश्रमात आयोजित केलेला कार्यक्रम



हा आध्यात्मिक पैलूंविषयी अभ्यासींच्या लेखनकौशल्याचा शोध घेण्यासाठी आणि त्यांना उजेडात आणण्यासाठी होता. त्यांना दिलेल्या यादीतून एक विषय निवडण्यास सांगितले गेले आणि मिशनचे साहित्य वाचून त्यावर एक लेख लिहिण्यास सांगण्यात आले. सुमारे पंधरा अभ्यासींनी १०० अभ्यासींच्या उपस्थितीत आपले लेख सादर केले. उपस्थितांनी अभ्यासींच्या प्रयत्नांची प्रशंसा केली. यामुळे मिशनचे साहित्य वाचण्यास आणि गुरुदेवांच्या सतत स्मरणात राहण्यास सहाय्य झाले अशी भावना सहभागींनी व्यक्त केली.

## युवा कार्यक्रम

### त्रिची, तामिळनाडू



दि. १० आणि ११ नोव्हेंबरच्या कार्यक्रमादरम्यान त्रिची आश्रम हे तरुण आणि उत्साही अभ्यासींसाठी जणू घरच झाले होते.

सकाळच्या सत्संगानंतर बंधू राजेश राठोड यांनी ‘अंतरात्म्याचा प्रवास’ यावर एक सादरीकरण केले. यानंतर सहभागींना एक प्रश्नावली देण्यात आली जी आत्मपरिक्षणात्मक आणि विचार करण्यास उद्युक्त करणारी होती. इतर सत्रांमध्ये, छोट्या छोट्या ध्वनिचित्रफितींच्या सहाय्याने स्पष्टीकरण, ‘तुमच्या हृदयाचे ऐका’ यावर परस्पर–संवादाचे सत्र, गुरुदेव, मिशन आणि पद्धती यावर एक प्रश्नमंजुषा, आणि ‘युथ – अ टाईम ऑफ प्रॉमिस आणि एफर्ट’ या पुस्तकातील एक सादरीकरण यांचा समावेश होता. कार्यक्रमाचा शेवट सायंकाळच्या सत्संगाने झाला. सहभागींना कृतज्ञतेची आणि एकात्मतेची भावना यावेळी खोलवर जाणवली.

### श्री गंगानगर

श्री गंगानगर केंद्रांमध्ये युवकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय सत्रामध्ये पंधरा अभ्यासी सहभागी झाले होते. त्यांनी विचारांच्या शक्तीवर आधारित ‘द सिक्रेट’ नावाचा एक माहितीपट पाहिला. विचारांची शक्ती आपल्यावर कसे काम करते, आपल्या आयुष्यावरील तिचा प्रभाव आणि आपल्या विचारांमध्ये परिवर्तन करुन आपण आपले भविष्य कसे घडवू शकतो हे त्यामध्ये दाखविण्यात आले होते. म्हणूनच, आपल्याला कोण बनायचे आहे यावर आपण नक्कीच विचार करायला हवा.

प्रश्नमंजुषेच्या कार्यक्रमादरम्यान वेगवेगळे विषय असलेल्या कागदाच्या चिठ्ठ्या प्रत्येकास वाटण्यात आल्या. प्रत्येक अभ्यासीने स्वतःचा अनुभव आणि ज्ञान यावर आधारित वेगवेगळे दृष्टीकोन कथन केले. अनेक स्पष्टीकरणे आणि नव्या गोष्टी समोर आल्या आणि आपल्या रोजच्या साधनेमध्ये उपयोगी पडणाऱ्या ज्ञानात भर पडली.




### नातेसंबंधावरील सत्र, कोलकाता

दि.२४ नोव्हेंबर रोजी बी.एम.ए., कोलकाता येथे ‘सहजमार्गाच्या प्रकाशात नातेसंबंध’ या विषयावर भगिनी स्नेहल देशपांडे यांनी २ तासांचे एक सत्र संचालित केले. त्यांनी नात्याची व्याख्या, त्याचे महत्त्व, जास्त देत राहून आपल्या नात्यांमध्ये एकोपा आणणे आणि एकमेकांशी जोडले जाण्याचा दृष्टीकोन वाढीस लावण्याचे महत्व सांगितले. या सत्रात सहभागींनी सर्वात आनंदी क्षणांची आणि असे क्षण, जे अधिक चांगले होऊ शकले असते अशांची एक यादी बनविली. त्यानंतर प्रत्येक गटास नात्याचा एक नमुना दर्शविणारी एक ध्वनिचित्रफीत दाखविण्यात आली, त्याच्या सकारात्मक आणि नकारात्मक पैलूंवर तसेच प्रत्येक नात्याचे महत्व यावर चर्चा करण्यास सांगितले गेले. या ध्वनिचित्रफीतीमध्ये व्यक्त झालेले प्रमुख गुण– बिनशर्त प्रेम, अनासक्ती, एकनिष्ठता, विश्वास, भरवसा, नम्रता, परस्परांशी जोडले जाणे, संयम, सहिष्णुता हे होते. सत्राचा शेवट हार्ट (हार्ट एनर्जी अम्प्टिव्युड रेसोनन्स टेस्ट) ने झाला आणि ‘हार्टस कोड’ हे पुस्तक वाचावे असे सुचविण्यात आले. या सत्राने सहभागींना यशस्वी नातेसंबंधातील काही महत्वाचे घटक आत्मसात करण्यास मदत झाली.

### तिरुप्पुरच्या युवकांची मणपाक्कमला भेट

दि.१३ ते १५ सप्टेंबर दरम्यान तिरुप्पुर केंद्रातील सुमारे १८८ अभ्यासींनी मणपाक्कम आश्रमास भेट दिली. ते आध्यात्मिक उन्नती आणि साधना यावरील एका सत्रास उपस्थित राहिले. मणपाक्कम येथील वरिष्ठ अभ्यासींसमवेत त्यांचे प्रश्नोत्तराचे एक सत्र झाले आणि आश्रमात त्यांनी स्वयंसेवक म्हणूनही कामही केले. दि.१४ व १५ रोजी ते गुरुदेवांना भेटले आणि त्यांच्याबरोबर काही वेळ व्यतीत केला. सर्व अभ्यासी अतिशय उत्साही आणि नव्या उर्जेने भारल्यासारखे वाटत होते.



## क्षणचित्रे

### पोलाच्ची, तामिळनाडू



दि. १ डिसेंबर रोजी बंधू अरुणाचलम आणि भगिनी सुमती यांनी एका संपूर्ण दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमात सकाळी 'निवडा आणि बोला (दिलेल्या विषयावर)' हे सत्र व दुपारी प्रश्नमंजुषा ठेवण्यात आली होती. या कार्यक्रमामुळे दैनंदिन साधना नियमितपणे आणि गांभीर्याने करण्याची तसेच आध्यात्मिक प्रगतीची, निर्धार आणि उत्साह यांनी परिपूर्ण अशी एक नवी उर्मी अभ्यासींच्या हृदयामध्ये जागृत झाली.



### दुर्ग, छत्तीसगढ

दि.२० ऑक्टोबर रोजी झालेल्या जी.आय.टी.पी.च्या 'सफाई' या कार्यक्रमात बत्तीस अभ्यासींनी भाग घेतला. साधनेमध्ये शिरकाव केलेले, विचलित करणारे घटक लक्षात येण्यास तसेच आपल्या पद्धतीमध्ये नमूद करण्यात आलेली सफाईची प्रक्रिया उत्तम प्रकारे समजण्यास या सत्राचा उपयोग झाला असे सहभागींना वाटले.



### जबलपूर, मध्यप्रदेश

सैनिक शाळा आणि जय ज्योती विद्यालय, रेवा येथील इयत्ता सहावी ते बारावीचे विद्यार्थी व शिक्षक तसेच कर्मचाऱ्यांसाठी स्वयंविकास, अध्यात्म आणि मूल्याधारीत शिक्षण या विषयांवर आधारीत व्ही.बी.एस.सी. प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राप्ती व प्रेरणा, दृष्टीकोन, अध्यात्म इ. गोष्टींचा अंतर्भाव या कार्यक्रमामध्ये होता. सहभागींनी या कार्यक्रमाची प्रशंसा केली. कार्यक्रमाच्या समारोपादरम्यान (सहज मार्ग) पद्धतीबद्दल अनेकजणांनी चौकशी केली.

### ठाणे, महाराष्ट्र



दि.१६ नोव्हेंबर रोजी हास्यक्लब, कोलशेत रोड, ठाणे येथे चार प्रशिक्षकांनी सुमारे सत्तावीस व्यक्तींकरिता हिंदीमध्ये खुले सत्र आयोजित केले होते. समन्वयकांनी यावेळी ध्यानामुळे आपण भूतकाळ आणि भविष्यकाळाची चिंता न करता वर्तमान क्षणात जगायला शिकतो व त्यामुळे तणावमुक्त जीवन जगू शकतो ह्या गोष्टीवर भर दिला. प्रशिक्षकांनी ते सिटींगसाठी कधीही उपलब्ध आहेत असेही यावेळी स्पष्ट केले.



### कूर्ग येथील अभ्यासींची मणपक्कम भेट

दि. १९ ते २३ नोव्हेंबर दरम्यान कूर्ग येथील ४५ अभ्यासींनी मणपक्कम आश्रमाला भेट दिली. कूर्ग आश्रमाची प्रगती होत आहे हे ऐकून पू. गुरुदेवांनी समाधान व्यक्त केले. अभ्यासींनी त्यांना कुर्गी फेटा आणि मूळ चांदीचा असणारा पण सोन्याचे पाणी चढवलेला पीछेकाठी( पारंपारिक कमरेचा चाकू) भेट दिला.

यानंतर गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले. जरी हे केंद्र वीस वर्षे जुने असले तरी नुकतीच याच्या प्रगतीला चालना मिळाली आहे. सध्या, मडिकेरी, करंगुडा आणि विराजपेठ या तीन वेगवेगळ्या ठिकाणी सत्संगाची केंद्रे आहेत.

## त्रिची, तामिळनाडू



अभ्यासींना मिशनचे साहित्य वाचण्यासाठी प्रवृत्त करण्याच्या हेतूने सप्टेंबर २०१३ पासून 'साहित्यातून शिकणे' या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.

प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी संपूर्ण दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन करून, त्यात ठरविलेल्या पुस्तकावर आधारीत प्रश्नमंजुषा ठेऊन तसेच त्या पुस्तकातील गुरुदेवांच्या संदेशांची देवाण–घेवाण करून पुस्तकांबद्दल गोडी निर्माण करण्याचा हा स्तुत्य उपक्रम आहे. अशाप्रकारे सत्योदय, माझे गुरुदेव आणि मानव विकासात सदगुरुची भूमिका या तीन पुस्तकांवर आधारीत कार्यक्रम झाले आहेत.

या उपक्रमामुळे अभ्यासींना मिशनची पुस्तके वाचण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. याचा पुरावा म्हणजे म्हणजे पुस्तकांच्या विक्रीमध्ये झालेली वाढ. यामुळे अभ्यासी स्वतःच्या आध्यात्मिक प्रगतीदरम्यान येणाऱ्या अनुभवांची सगळ्यांशी खुलेपणाने देवाण–घेवाण करू लागले. पुस्तकांचे आकलन अनेक अंगांनी वाढण्यास मदत झाली. सांघिक भावना, बंधुभाव आणि अध्यात्मकेंद्री जीवन इ. या कार्यक्रमाची निष्पत्ती होती.

## चिकमंगळूर, द. कर्नाटक





दि.२४ ते २६ ऑक्टोंबर दरम्यान बंधू मोहनदास हेगडे यांनी ए.आय.टी कॉलेज, बी.एस.एन.एल. कार्यालय, युरेका ॲकेडेमी, एम.ई.एस. कॉलेज, टी.एम.एस. कॉलेज इ. ठिकाणी अनेक खुल्या सत्रांचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचा मूळ उद्देश्य अध्यात्माची गरज आणि तणावमुक्त जीवनासाठी ध्यानाचे महत्त्व हे होते.


दि.२६ ऑक्टोबर रोजी त्यांनी आयोजिलेल्या एका गृहसंमेलनामध्ये चिकमंगळूर केंद्राची प्रगती व्हावी याविषयीच्या उपायांबद्दल चर्चा करण्यात आली.

दि.२७ ऑक्टोबर रोजी लायन्स भवन येथील अर्ध्या दिवसाच्या कार्यक्रमासाठी कादूर आणि हरिहरपूरा येथून अभ्यासी आले होते. बंधू हेगडे यांनी गुरुदेवांच्या जीवनातील उदाहरणे देऊन संतुलित जीवनावर व्याख्यान दिले. यानंतर साधनेतील अडथळे कसे दूर करावेत यावर गटचर्चा झाली. बंधू रमाकांत यांनी ते अभ्यासी झाल्यानंतर आलेले अनुभव कथन केले. सहभागी अभ्यासींना हे सत्र खूप आवडले व त्यांनी भविष्यात अशी अनेक सत्रे घेण्यात यावीत अशी आशा व्यक्त केली.

## नवीन प्रकाशने





**डी.व्ही.डी.**

हृदयीचे बोल २०११–खंड २(इंग्रजी)
द नीड ऑफ दि टाईम (इंग्रजी)
पॅरेंटहूड (इंग्रजी)


### पुस्तके



सहजमार्गाची तत्वे खंड १३ (तामिळ)



प्रेम आणि मृत्यु (तेलुगु)




वृक्ष का फल (हिंदी)




अभ्यासी डायरी (हिंदी)



कोळ्याचे जाळे खंड १ (मल्याळम)

## योगाश्रम, सिलिगुडी, पश्चिम बंगाल

## प्रकाशाचे केंद्र







"लक्षात ठेवा की निसर्गाची सर्व साधनसंपत्ती, मग ते आरोग्य असो, किंवा धनसंपदा असो वा किर्ती अथवा समृद्धी असो, सर्व काही परत मिळवता येते परंतु वेळ मात्र नाही. गेलेला वेळ परत मिळविता येत नाही."

पार्थसारथी राजगोपालाचारी, ११ जुलै २०१०, सिलिगुडी.



पश्चिम बंगालच्या उत्तर भागात हिमालयाच्या पायथ्याशी सिलिगुडी हे छोटे गाव वसलेले आहे. या गावाच्या स्थानामुळे हे भारताच्या ईशान्य दिशेचे प्रवेशद्वार आहे. याची सीमा ही नेपाळ, बांगलादेश व भूतान ह्या तीनही देशांच्या सीमांना लागून आहे. ४.८३ एकरच्या जमिनीवर वसलेला हा आश्रम चोबाभिटा या गावात आहे. हे गाव मुख्य गावापासून १२ कि.मी., रेल्वे स्टेशन पासून ८ कि.मी. व विमानतळापासून २५ कि.मी. अंतरावर आहे. ह्या आश्रमातून बर्फाने आच्छादलेल्या कांचनजंगा शिखराचे विलोभनीय दृष्य दिसत असल्याने आश्रमाला नैसर्गिक सौंदर्याची जणू देणगी लाभली आहे.

गुरुदेवांनी ह्या आश्रमाच्या जागेची नोंदणी दि. २ नोव्हेंबर २००९ रोजी गंगटोकला जाताना केली. गंगटोकहून परत येताना त्यांनी आश्रमाचे बांधकाम चालू करण्याची परवानगी दिली. आठ महिन्याच्या कालावधीत आश्रम बांधला गेला. या आश्रमात गुरुदेवांचे कुटीर, ३००० चौरस फूट क्षेत्रफळाचे ध्यानगृह, सुमारे ३०० अभ्यासी राहू शकतील असा निवास कक्ष तसेच प्रसाधनगृह आहे. सुमारे २५० अभ्यासींना जेवता येईल असा भोजनकक्ष व स्वयंपाकगृह आहे. आश्रमात रस्ते तयार करण्यात आले आहेत व अनेक झाडे लावण्यात आली आहेत.

या आश्रमाचे उद्घाटन गुरुदेवांनी दि. ११ जुलै २०१० रोजी ईशान्य भारतातून व नेपाळ येथून आलेल्या सुमारे ६०० अभ्यासींच्या उपस्थितीत केले. सत्संग झाल्यावर गुरुदेवांनी भाषण दिले. या प्रदेशात मिशनचा विकास व्हावा या करीता आश्रमाचा वापर करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. गुरुदेवांनी सुचविले की दरवर्षी कमीत कमी २ ते ३ प्रादेशिक संमेलने येथील डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या अभ्यासींसाठी आयोजित करण्यात यावीत. या संमेलनादरम्यान होणारा राहण्याचा व जेवणाचा खर्च सहज मार्ग स्पिरिच्युॲलिटी फौंडेशन द्वारा केला जाईल. ह्या आश्रमाचे उद्घाटन झाल्यापासून आपल्या सर्व गुरुदेवांचे वाढदिवस सिलिगुडीतील व जवळपासच्या अभ्यासींसाठी दरवर्षी येथे साजरे केले जातात.





To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org

© 2013 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.